**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**जिल्हा परिषद पालघर अंतर्गत पदभरती सन २०१९**
**अनुसुचीत क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) व अनुसुचीत क्षेत्रातील (पेसा) पदभरती**
**गट - क , संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात**

जिल्हा परिषद पालघर यांच्या आस्थापनेवरील खालील गट क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**रिक्त पदांचा तपशिल (बिगरपेसा क्षेत्र - एकूण संवर्ग - १७ रिक्त पदे - २८८ )**

| अ.क्र. | संवर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), बांधकाम विभाग | ७ |
| २ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | ५ |
| ३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), लघूसिंचन विभाग | ६ |
| ४ | विस्तार अधिकारी (पंचायत) | २ |
| ५ | आरोग्य पर्यवेक्षक | २ |
| ६ | औषध निर्माता | ३५ |
| ७ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | ३३ |
| ८ | आरोग्य सेवक (पुरूष) बिगर पेसा क्षेत्र | २२ |
| | आरोग्य सेवक (पुरूष) Male seasonal spraying field worker बिगर पेसा क्षेत्र | ३० |
| ९ | आरोग्य सेविका (बिगर पेसा क्षेत्र) | ६७ |
| १० | विस्तार अधिकारी (कृषी) | ७ |
| ११ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | २३ |
| १२ | पशुधन पर्यवेक्षक बिगर आदिवासी क्षेत्र | ३ |
| १३ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ७ |
| १४ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (बिगर आदिवासी क्षेत्र) | २ |
| १५ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ९ |
| १६ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | १३ |
| १७ | विस्तार अधिकारी (सां.) | १० |
| १८ | कनिष्ठ लेखा अधिकारी | ४ |
| १९ | कनिष्ठ यांत्रिकी | १ |
| | **एकूण** | **२८८** |

**रिक्त पदांचा तपशिल ( पेसा क्षेत्र - एकूण संवर्ग - ०५  रिक्त पदे ४२०)**

| | | |
|---|---|---|
| १ | ग्रामसेवक (कंत्राटी) | ४२ |
| २ | आरोग्य सेवक (पुरूष)  पेसा क्षेत्र | ४० |
| | आरोग्य सेवक (पुरूष) Male seasonal spraying field worker  पेसा क्षेत्र | ३७ |
| ३ | आरोग्य सेविका (आदिवासी क्षेत्र) | २७६ |
| ४ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (आदिवासी क्षेत्र) | १४ |
| ५ | पशुधन पर्यवेक्षक  आदिवासी क्षेत्र | ११ |
| | **एकूण** | **४२०** |

**ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ क्र | ऑनलाईन पद्धतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पद्धतीने अर्ज  भरण्याचा अंतीम दिनांक |
|---|---|---|
| १ | दि.२६/०३/२०१९  पासुन रात्री १०.०० P.M. वाजेपासुन | दि.१६/०४/२०१९ रात्री ११.५९ P.M. वाजेपर्यंत |

सदर पदांसाठीची सविस्तर जाहीरात ही www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद पालघरच्या www.zppalghar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वरील पदांसाठी सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय पदांची माहिती, शैक्षणिक अर्हता व अनुभव कमाल व किमान वयोमर्यादा. भरती प्रक्रिया शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना परिक्षेचे स्वरुप व माध्यम, निवड पद्धत, सर्वसाधारण अटी व शर्ती, परिक्षेचे स्वरुप इत्यादींबाबत अधिक माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मा. राज्यपाल यांचे अधिसुचना दि. ०९/०६/२०१४ नुसार उपरोक्त पेसा क्षेत्रातील अनु क्रं १ ते ५  मधील उपलब्ध पदांसाठी पालघर जिल्हयातील स्थानिक अनुसुचीत जमातीच्याच उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे, अर्ज करण्यासाठी www.mahapariksha.gov.in हे संकेतस्थळ दि.२६/०३/२०१९  पासुन रात्री १०.०० P.M. वाजेपासुन ते दि.१६/०४/२०१९ रात्री ११.५९ P.M. वाजेपर्यंत कार्यरत राहील. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी जाहीरातीत दिलेल्या सर्व सुचना सविस्तर व काळजीपुर्वक वाचुन ऑनलाईन अर्ज करावेत. ऑफलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना राहतील आणि त्यांचा निर्णय अंतीम राहील. तसेच भरती प्रक्रीयेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण :- पालघर

दिनांक :-  ०३/०३/२०१९

स्वाक्षरी/-

**मिलिंद बोरीकर (भा.प्र.से.)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद, पालघर**